# 92.7 बिग एफएम मुंबईने जाहीर केली बेनड्रिल बिग गोल्डन व्हॉईस सीझन ६च्या विजेत्यांची नावे

**~ममता शर्मा आणि रामजी गुलाटी यांनी आघाडीच्या ५ स्पर्धकांचे परीक्षण करून मुंबई विभागात स्वरजित सिंग याला निवडले विजेता ~**

**~राष्ट्रीय विजेत्याच्या स्पर्धेत स्वरजित इतर शहरांतील विजेत्यांना देणार टक्कर ~**

**मुंबई: 92.7 बिग एफएम या भारतातील एका सर्वात मोठ्या रेडिओ नेटवर्कने बेनड्रील बिग गोल्डन व्हॉईस** या आपल्या बहुप्रतिक्षित ऑन-एअर गायन स्पर्धेच्या ६ पर्वाची घोषणा महिनाभरापूर्वी केली होती. आता हे पर्वही अंतिम टप्प्याकडे हळूहळू कूच करत आहे. नुकतेच या रेडिओ स्टेशनने शहर पातळीवरील अंतिम फेरी आयोजित केली होती. या फेरीतील विजेता राष्ट्रीय पातळीवर अंतिम विजेता ठरण्यासाठी इतर स्पर्धकांसोबत स्पर्धा करेल. ख्यातनाम **गायक सोनू निगम** राष्ट्रीय पातळीवरील परीक्षक असतील. ते अंतिम स्पर्धकांना मार्गदर्शनही करतील. तर, **'दबंग' गायिका ममता शर्मा आणि पार्श्वगायक रामजी गुलाटी** मुंबई फेरीसाठी परीक्षक होते. सर्व स्पर्धकांच्या परफॉर्मन्सचे सखोल परीक्षक केल्यानंतर त्यांनी **स्वरजित सिंग**ला शहरातील विजेता घोषित केले.

अंतिम फेरी आणि मुंबईतील स्पर्धकांचे परीक्षण याबद्दल **गायिका ममता शर्मा** म्हणाल्या, "बेनड्रील बिग गोल्डन व्हॉईस सीझन ६ मधील मुंबईच्या अत्यंत प्रतिभावान अशा स्पर्धकांमधून आघाडीचे पाच स्पर्धक निवडणे आमच्यासाठी खरंच कठीण होते. या पाचही स्पर्धकांचा आवाज फारच अनोखा आहे, त्यात आत्मीयता आहे, असे मी म्हणेन. प्रत्येकाची अशी खास वेगळी शैली आहे आणि त्यामुळेच त्यातील एकाला अंतिम फेरीसाठीचा मुंबईतील विजेता निवडणं काहीसं कठीण होतं."

शहरातील अंतिम फेरी आणि मुंबईसाठी परीक्षक असणं याबद्दल **पार्श्वगायक रामजी गुलाटी** म्हणाले, "बेनड्रील बिग गोल्डन व्हॉईस हा असा एक सिंगिंग टॅलेंट हंट आहे, ज्यात उत्तम गायकाची निवड फक्त त्याच्या आवाजामुळे केली जाते. त्यामुळेच, *92.7* बिग एफएमचा हा शो इतर अशा कार्यक्रमांहून वेगळा ठरतो. बेनड्रिल बिग गोल्डन व्हॉईस ही उदयोन्मुख गायकांना आपली प्रतिभा दाखवण्यासाठी एक उत्तम संधी आहे. मी येथे एक बाब नमूद करू इच्छितो... माझ्या मते विजेता कोणीही ठरू देत. मात्र, तुम्ही सगळेच खरं तर विजेते आहात. कारण, तुमच्या अनोख्या आवाजाने, तुमच्या प्रतिभेनेच तुम्हाला या व्यासपीठापर्यंत आणलं आहे. या सगळयांमध्येच प्रतिभा आहे आणि त्यामुळेच भविष्यात ते इतरांपेक्षा वेगळे ठरतील."

शहरातील अंतिम फेरी जिंकल्याचा अनुभव कथन करताना **स्वरजित सिंग** म्हणाला, "मुंबईतील आघाडीच्या ५ स्पर्धकांमध्ये येणं आणि त्यानंतर चक्क मुंबईचा विजेता बनणं म्हणजे फारच आनंदाची गोष्ट आहे. इथे प्रत्येक जणच सरस होता. त्यामुळे स्पर्धा अत्यंत चुरशीची होती. मी काहीसा घाबरलो होतो पण मी शक्य तितका चांगला परफॉर्मन्स दिला. अंतिम फेरीत मुंबईचे प्रतिनिधीत्व करण्यास आणि राष्ट्रीय परीक्षक असलेल्या सोनू

निगमजींसमोर परफॉर्मन्स देण्यास मी फारच उत्सुक आहे. बेनड्रिल बिग गोल्डन व्हॉईस सीझन ६चा भाग असणं हा आजवर फारच छान अनुभव आहे."

हा किताब पटकावण्यासाठी स्पर्धकांनी प्रचंड उत्साह आणि ऊर्जेसह परफॉर्मन्स दिला. **बिग एमजे दिलीप** यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी परीक्षकांनी स्पर्धकांना काही मोलाच्या टिप्स देऊन त्यांचा उत्साह वाढवला. या शोने देशभरातील स्पर्धकांना आपली प्रतिभा दाखवण्यासाठी आमंत्रित केले होते. विविध टप्प्यांमधून स्पर्धकांची निवड करत अखेर प्रत्येक शहरातील पाच स्पर्धक निवडण्यात आले. या पाच स्पर्धकांनी शहरातील फिनाले राऊंडमध्ये एकमेकांना टक्कर दिली आणि त्यातून प्रत्येक शहराचा एक विजेता निवडण्यात आला. सर्व शहरातील विजेते आता ग्रँड फिनालेमध्ये एकमेकांसमोर उभे ठाकतील. **गायक सोनू निगम** या अंतिम फेरीचे परीक्षण करतील आणि सर्वोत्तम स्पर्धकाला सहाव्या पर्वाचा विजेता घोषित करण्यात येईल.

XXXX